# खाजगी वैद्यकीय सेवेबद्दल आलेल्या अनुभवांची जनमत प्रश्नावली

**'हो' / 'नाही' या दिलेल्या दोन पर्यायांपैकी एका पर्यायावर टीक ( ✔ ) करून आपले मत नोंदवावे.**

| क्र. | विधान | हो | नाही | लागू नाही |
|---|---|---|---|---|
| १. | पेशंट सीरिअस असताना डिपॉझिट न भरता उपचार सुरू करण्यात आले का? | | | |
| २. | आजाराची कारणे व उपचार याबद्दल तुम्हाला योग्य माहिती दिली गेली का? | | | |
| ३. | ऑपरेशन/ प्रोसिजर करण्याअगोदर सही करायला पुरेसा वेळ दिला गेला का? | | | |
| ४. | आजाराबद्दल, शस्त्रक्रियेबद्दल वा प्रोसिजरबद्दल काही प्रश्न विचारल्यानंतर व्यवस्थित माहिती दिली गेली का? (जर माहिती दिली गेली नसेल वा नाराजी दाखविण्यात आली असेल तर 'नाही' वर टीक (✓) करा)? | | | |
| ५. | तुम्हाला हव्या अशा दुसऱ्या तज्ज्ञाचे मत घ्यायचे असताना तसे करू दिले का? | | | |
| ६. | इन्श्युरन्स असल्यामुळे तुमचे बिल वाढवण्यात आले असे तुम्हाला वाटते का?. | | | |
| ७. | सुरुवातीला व वेळोवेळी बिलाबद्दल कारणांसह तुम्हाला कल्पना देण्यात आली का? | | | |
| ८. | तुम्हाला आकारण्यात आलेले बिल हे अगोदर सांगितलेल्या बिलापेक्षा किंवा अपेक्षेपेक्षा खूप जास्त होते का? | | | |
| १०. | हॉस्पिटलच्या किंवा विशिष्ट दुकानातूनच औषधे खरेदी करण्यासाठी दबाव टाकण्यात आला का? | | | |
| १२. | बिल भरण्यासाठी तुम्हाला एफडी मोडाव्या लागल्या / सोनं विकावं लागलं/किंवा चिजवस्तू विकाव्या लागल्या का? | | | |
| १३. | तुमच्या खाजगी हॉस्पिटल्स्मध्ये मिळणाऱ्या सेवांबद्दलच्या 'समाधानाची पातळी' खालील पर्यायात एका पर्यायावर टीक (✓) करून नोंदवा.<br>१) तीव्र असमाधान ☐ २) असमाधान ☐<br>३) समाधानकारक ☐ ४) चांगली ☐ ५) मत नाही ☐ | | | |
| १४. | खाजगी हॉस्पिटल्स्मधल्या रेटवर आणि दर्जावर नियंत्रण आणण्याची गरज आहे असं तुम्हाला वाटते का? | | | |
| १५. | प्रिस्क्रिप्शनवर औषधाच्या ब्रँड नावाबरोबरच जेनेरिक नाव लिहिणे (ज्यामुळे औषधं स्वस्तात उपलब्ध होतील) खाजगी डॉक्टरांवर कायद्याने बंधनकारक असावे असं तुम्हाला वाटते का? | | | |
| १६. | खाजगी आरोग्यसेवा पारदर्शक व पेशंटला उत्तरदायी करण्याच्या प्रयत्नात काही वेळ द्यायची आपली तयारी आहे का? | | | |

***(अजून काही विस्तृत माहिती द्यायची असेल तर स्वतंत्र पानावर लिहून द्या. जास्तीत जास्त ३०० शब्द)***

# खाजगी वैद्यकीय सेवेबद्दल आलेल्या अनुभवांची

# जनमत चाचणी

नमस्कार,

आज असं दिसतंय की समाजात खाजगी डॉक्टर व हॉस्पिटलबद्दल खऱ्याखोट्या कारणांनी बरीच नाराजी आहे. हॉस्पिटलवर होणारे वाढते हल्ले, बिलाबद्दल होणारे गंभीर वाद हे या नाराजीच्या हिमनगाचे दृष्य टोक आहे. 'साथी' (पुणे, महाराष्ट्र) ही संस्था गेली १५ वर्षे आरोग्याच्या सामाजिक पैलूंचा अभ्यास व पाठपुरावा करत आली आहे. रुग्णांचे हक्क कोणत्याही वैद्यकीय व्यवहाराचा मूलभूत पाया असला पाहिजे. सर्व प्रकारच्या वर्गातील लोकांना रास्त दरात दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळाल्या पाहिजेत हा आमचा आग्रह आहे. 'खाजगी हॉस्पिटलमध्ये मिळणाऱ्या सेवा' या प्रश्नाबद्दल आम्ही जनमताचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यासाठी खाजगी हॉस्पिटलमध्ये सेवा घेतलेल्या व्यक्तींना आलेले चांगले तसेच वाईट अनुभव आम्ही गोळा करत आहोत. या अनुभवांचे विश्लेषण करून आलेले निष्कर्ष सरकारची वैद्यकीय धोरणे रुग्णकेंद्री असावीत असा पाठपुरावा करण्यासाठी आम्ही वापरणार आहोत. त्यासाठी पुढे खाजगी दवाखान्यातील काही महत्त्वाच्या पैलूंसंबंधात आम्ही काही प्रश्न देत आहोत. आपण / आपले नातेवाईक किंवा परिचित या वर्षभरात नक्कीच एखाद्या आजारासाठी खाजगी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाले असतील. या आपल्या अनुभवांपैकी सर्वात अलीकडच्या अनुभवानुसार आपल्याला कसा अनुभव आला हे आपण **'हो'** अथवा **'नाही'** या दिलेल्या दोन पर्यायांपैकी एका पर्यायावर टीक (✓) करून आपले मत नोंदवावे ही विनंती. तसेच जर या प्रश्नावलीतले एखादे विधान आपल्याला लागू पडत नसेल, अशा वेळेस **'लागू नाही'** यावर टीक (✓) करावे.

---

### डिस्क्लेमर (पूर्ण माहिती वाचल्यानंतर खालील फॉर्म भरण्याबद्दल संमती आहे / नाही)

आपल्या मतांचा अभ्यास करून येणाऱ्या निष्कर्षांचा उपयोग आम्ही सामाजिक जन-जागृतीसाठी करणार आहोत. हे मान्य असल्यासच खालील फॉर्म भरावा ही विनंती. मान्य नसल्यास भरू नये. सोबत आपले नाव, पत्ता व संपर्क नंबर ही आपली व्यक्तिगत माहिती द्यायची आपली इच्छा असेल तर जरूर द्यावी ही विनंती. आपली सर्व वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवली जाईल याची आम्ही खात्री देत आहोत.

नाव- ____________________

राज्य- __________ जिल्हा- __________ गाव/ शहर- __________

मोबाईल नंबर/ लँडलाईन नंबर-

मला 'साथी' टीम बरोबर संपर्क साधून या विषयावर अजून माहिती द्यायची आहे : हो- ☐ नाही- ☐

'साथी' वेबसाईट - http://www.sathicehat.org ई-मेल - sathicehat@gmail.com